<u>प्रेसनोट</u>

दि.२२/०२/२०२१

# वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथील पोलीस अंमलदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी :- लोकसेवक - सचिन कुबेर जाधव, वय - ३७<br>पद - पोलीस नाईक<br>नेमणुक - वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालय |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- (दोन लाख रूपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक २२/०२/२०२१<br>सापळा दिनांक :- दिनांक २२/०२/२०२१<br>यातील तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांच्या विरूद्ध भा.द.वि. कलम ४९८ - अ प्रमाणे गुन्हा दाखल असून त्यामध्ये त्यांचा अटकपुर्व जामीन मंजूर झालेला आहे. अटकेची प्रक्रीया करून जामिनावर सोडण्यासाठी व गुन्हयाचे दोषारोपपत्र लवकर पाठविण्यासाठी प्रथम २,००,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १,००,०००/- रूपये स्वीकारण्याचे मान्य करून त्यापैकी ५०,०००/- रूपये लाच स्वीकारली.<br>वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. गुन्हयाचा तपास श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.